लोकमत
epaper.lokmat.com
पुणे, गुरुवार, दि. २४ नोव्हेंबर २०२२
८

# मुलींच्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मुलींच्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. दीपक माने, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव प्रा. आशिष तळेकर, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, अरविंद दौंडकर, निवड समिती सदस्य प्रा. विजय देशमुख, राजेंद्र सोनवणे, प्रवीण व्यवहारे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे उपस्थित होते. पंच म्हणून पुणे जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे उपाध्यक्ष शरद काळे, राष्ट्रीय खेळाडू सविता फलके, प्रा. शिवाजी भिंताडे, प्रा. रोहित तांबे, प्रा. बी.एस. पाटील, प्रा. विवेक साळवे, प्रा. स्वप्नील कर्पे, प्रा. एल. कांडेकर यांनी काम पाहिले. स्पर्धेमध्ये साक्षी मस्के या खेळाडूची बेस्ट वेटलिफ्टर म्हणून निवड झाली. या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा जानेवारी २०२३ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळक यांनी केले, तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.



मुलींच्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेतील एक क्षण.

# राजगुरू महाविद्यालयातील तुषार गभालेला फेलोशिप

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या मराठी पदव्युत्तर विभागातील तुषार गभाले व प्रतीक्षा खराडे हे दोन विद्यार्थी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) उत्तीर्ण झाले आहेत. यातील तुषार गभाले या विद्यार्थ्याला राष्ट्रीय स्तरावरील ज्युनिअर रिसर्च फेलोशिप (जेआरएफ) जाहीर झाली आहे, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी दिली.



गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, अरविंद दौंडकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. दिलीप मुळूक उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. साईनाथ पाचारणे यांनी मार्गदर्शन केले.